वाचले :-

१) श्री. मोमीन ए ए, कनिष्ठ अभियंता यांचा दि. ०३/०२/२०१६ चा विंनती अर्ज.

२) लेखा विभागाकडील एन.ओ.सी क्र. लेखा/घरकर्ज/कावि/२०६२/१५ दि. ०५/०२/२०१५

३) आदेश क्र. प्रशा/१/कावि/९२८/९७ दि. ४/१०/१९९७

४) आदेश क्र. प्रशा/१/कावि/११७५/२०१३ दि. २९/०८/२०१३

५) दिनांक :- १२/०२/२०१६ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ड क्षेत्रिय कार्यालय, रहाटणी
क्र. डक्षे/स्था/१/कावि/१०६/१६
दिनांक :- १२/०२/२०१६

**विषय :-** <u>**घरकर्ज व्याजापोटी ज्यादा कपात झालेली रक्कम अदा करणे बाबत..**</u>
**श्री. मोमीन अब्दुलहम्मीद अब्दुलरौफ, कनिष्ठ अभियंता**

आदेश

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड क्षेत्रिय कार्यालयांतर्गत येणा-या स्थापत्य विभागात श्री. मोमीन अब्दुलहम्मीद अब्दुलरौफ हे कनिष्ठ अभियंता या पदावर कामकाज करीत आहेत. त्यांना नविन घर खरेदीकामी घरकर्ज र.रु १,८७,०००/- मंजूर करुन सदर कर्जाची वसुली माहे माहे फेब्रुवारी १९९५ पासून त्यांचे मासिक वेतनातुन दरमहा र.रु ९७०/- याप्रमाणे १ ते एकुण १९१ व शेवटचा हप्ता र.रु १७३०/- याप्रमाणे माहे डिसे २०१० अखेर वसुली केलेली आहे. मुद्दलाची संपूर्ण वसुली झालेनंतर व्याजाची वसुली त्यांचे मासिक वेतनातुन दरमहा र.रु ३९२०/- याप्रमाणे १ ते ४८ व माहे ऑगस्ट ११ मध्ये र.रु २१९०/- तसेच माहे सप्टेंबर २०१५ मध्ये र.रु ३९२६/- याप्रमाणे व्याजाची संपूर्ण वसुली करणेत आलेली आहे. मात्र घरकर्ज व्याजापोटी घरदुरुस्ती या सदराखाली माहे ऑगस्ट ११ व सप्टेंबर २०११ मध्ये र.रु ३९२०/- याप्रमाणे दोन हप्ते र.रु ७,८४०/- इतकी जादा व्याजाची रक्कम कपात करणेत आलेली असल्याने श्री. मोमीन यांनी वाचले क्र. १ चे अर्जान्वये घरदुरुस्ती सदराखाली जादा कपात केलेली र.रु ७,८४०/- मिळणेकामी विनंती केलेली आहे.

लेखा विभागाने सदरची जादा कपात केलेली रक्कम श्री. मोमीन अब्दुलहम्मीद अब्दुलरौफ, कनिष्ठ अभियंता यांना अदा करणेकामी वाचले क्र. २ चे एन.ओ.सी अन्वये इकडील कार्यालयास कळविले आहे. त्यानुसार घरदुरुस्ती सदराखाली जादा कपात केलेली र.रु ७,८४०/- (अक्षरी र.रु सात हजार आठशे चाळीस फक्त) श्री. मोमीन ए ए, कनिष्ठ अभियंता यांना अदा करणे आवश्यक आहे.

सबब, मी क्षेत्रिय अधिकारी, ड क्षेत्रिय कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी पुणे १७ वाचले ३ व ४ अन्वये मला प्रदान करणेत आलेल्या अधिकाराचा वापर करुन लेखा विभागाकडील एन.ओ.सी नुसार घरकर्ज व्याजापोटी घरदुरुस्ती या सदराखाली माहे ऑगस्ट २०११ व सप्टेंबर २०११ मध्ये र.रु ३९२०/- याप्रमाणे दोन हप्ते र.रु ७,८४०/- (अक्षरी र.रु सात हजार आठशे चाळीस फक्त) श्री. मोमीन अब्दुलहम्मीद अब्दुलरौफ, कनिष्ठ अभियंता यांना अदा करणेस या आदेशान्वये मान्यता देत आहे.

सही /-
**क्षेत्रिय अधिकारी**
ड क्षेत्रिय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
रहाटणी, पुणे १७

प्रति,
संबंधित कर्मचारी

प्रत :- १) लेखा विभाग